**माहे जुलै, २०२१ मध्ये विशेषत: दि. २२, २३ जुलै, २०२१ रोजी अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या कुटुंबांना मोफत अन्नधान्य, केरोसीन व तूरडाळ देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः अधापु २०२१/प्र.क्र ५०/नापु-२२,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: २४ जुलै, २०२१

वाचा:-

**शासन निर्णय महसूल व वन विभाग, क्रमांक सीएलएस-२०१८/प्र.क्र २२५/म-३, दि. ८ मार्च, २०१९**

प्रस्तावना :-

राज्यात माहे जुलै, २०२१ मध्ये विशेषत: दि. २२ व २३ जुलै, २०२१ रोजी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यांमध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे अनेक कुटुंबे बाधीत झाली आहेत. अशा बाधीत कुटुंबांना आपत्तकालीन परिस्थितीमध्ये किमान उदरनिर्वाहाचे साधन म्हणून राज्यशासनातर्फे अन्नधान्य (गहू व तांदूळ), केरोसीन व तूरडाळ उपलब्ध करुन देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे:-

**शासन निर्णय :-**

अ) रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सांगली व सातारा या जिल्ह्यांमधील माहे जुलै, २०२१ मध्ये विशेषत: दि. २२ व २३ जुलै, २०२१ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या कुटुंबांना प्रतिकुटुंब **१० किलो गहू व १० किलो तांदूळ (बाधीत कुटुंबाकडून मागणी झाल्यास तांदळाचे प्रमाण वाढवून एकूण २० किलो अन्नधान्य) व ५ लीटर केरोसीन तसेच ५ किलो तूरडाळ मोफत** उपलब्ध करुन देण्यात यावी.

ब) बाधीत कुटुंबांची संख्या/यादी संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्या जिल्ह्यातील संबंधित जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांच्याकडून उपलब्ध करुन घ्यावी. जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्हा स्तरावरील शासकीय गोदांमामध्ये इतर योजनांमधील शिल्लक असलेल्या अन्नधान्यामधून तात्काळ वाटप सुरु करावे.

अन्नधान्याच्या आवश्यकतेबाबतचे एकूण परिमाण त्यांनी शासनास कळविल्यानंतर सदर परिमाणाएवढया अन्नधान्याची मागणी MSP/MSP DERIVED RATE ने केंद्र शासनाकडे करण्यात येईल व त्याकरिता आवश्यक असलेला निधी वित्त विभागाकडून उपलब्ध झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांना उपलब्ध करुन दिला जाईल.

क) बाधीत कुटुंबांसाठी आवश्यक असलेले केरोसीन जिल्हाधिकारी यांना तात्काळ मोफत उपलब्ध करुन देण्याबाबत BPCL, IOC व HPCL या ऑईल कंपन्यांना शासन स्तरावरुन कळविण्यत यावे. याकरिता आवश्यक असलेला निधी वित्त विभागाकडून उपलब्ध झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांना उपलब्ध करुन दिला जाईल.

ड) बाधीत कुटुंबांसाठी आवश्यक असलेली तूरडाळ संबंधित जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यातील घाऊक बाजारातून खरेदी करुन त्याचे प्रतिकुटुंब ५ किलो या परिमाणात तात्काळ वाटप सुरु करावे. सदर तूरडाळीसाठी आवश्यक असलेला निधी जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या आपत्ती निवारण निधी मधून उपलब्ध करुन घ्यावा. किती परिमाणात तूरडाळ खरेदी करण्यात आली या बाबतची आकडेवारी जिल्हाधिकारी यांनी शासनास कळविल्यानंतर सदर तूरडाळीकरिता खर्च करण्यात आलेल्या रक्कमेएवढा निधी वित्त विभागाकडून उपलब्ध झाल्यानंतर जिल्हाधिकारी यांना उपलब्ध करुन दिला जाईल.

इ) अन्नधान्य, डाळी व केरोसीन यांचे वाटप झाल्यानंतर किती परिमाणात वाटप करण्यात आले व त्या करिता किती खर्च झाला ही आकडेवारी सर्व जिल्हाधिकारी यांच्याकडून प्राप्त झाल्यानंतर उपरोक्त बाबींसाठी आवश्यक असलेला निधी वित्त विभागाने तात्काळ उपलब्ध करुन द्यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०७२६११४१४२६१०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhir Deodatta Tungar

Digitally signed by Sudhir Deodatta Tungar
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8b555e4e3006da7480655b52484794686f18de73c0aa909267b188c86a755c75, pseudonym=5E1F07FF6933630D1833271F4B68D3392A0A1127, serialNumber=204E151470E2D21694C51F66F9B5A8FAAE544D15F6BFA4851335010591835680, cn=Sudhir Deodatta Tungar
Date: 2021.07.26 13:07:49 +05'30'

( सुधीर तुंगार )

**सह सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
४. मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव,
५. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा व विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ)
६. मा. राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव,
७. सर्व विभागीय आयुक्त,
८. जिल्हाधिकारी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा व सांगली,
९. उपायुक्त पुरवठा (कोकण व पुणे विभाग),
१०.जिल्हा पुरवठा अधिकारी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा व सांगली,
११.सर्व मंत्रालयीन विभाग,
१२.वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई
१३.सर्व खाजगी सचिव, मा. मंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.
१४.सर्व खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.
१५.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१६.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, ६वा मजला, विधानभवन, मुंबई
१७.सर्व विधान परिषद सदस्य व विधानसभा सदस्य.
१८. सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक,
१९.निवडनस्ती (कार्यासन नापु-२२)

**माहे जुलै, २०२१ मध्ये विशेषतः दि. २२, २३ जुलै, २०२१ रोजी अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या कुटुंबांना मोफत तूरडाळ खरेदी करण्याच्या प्रक्रियेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**
**शासन शुध्दीपत्रक क्रमांकः अधापु २०२१/प्र.क्र ५०/नापु-२२,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: २६ जुलै, २०२१

**वाचा:-**

**शासन निर्णय समक्रमांक दि. २४.७.२०२१**

**शुध्दीपत्रक :-**

संदर्भाधीन दि. २४.७.२०२१ मधील शासन निर्णयातील परिच्छेद (ड) मधील

**"त्यांच्या जिल्ह्यातील घाऊक बाजारातून"**

**ऐवजी**

**"NeML NCDEX Group Company या Platform चा वापर करुन जिल्हानिहाय निविदा प्रक्रिया राबवून"**

असे वाचावे.

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२१०७२६१७०६०३३३०६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sudhir Deodatta Tungar

Digitally signed by Sudhir Deodatta Tungar
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FOOD CIVIL SUPPLIES AND CONSUMER PROTECTION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8b555e4e3006da7480655b52484794686f18de73c0aa909267b188c86a755c75, pseudonym=5E1F07FF6933630D1833271F4B68D3392A0A1127, serialNumber=204E151470E2D21694C51F66F9B5A8FAAE544D15F6BFA4851335010591835680, cn=Sudhir Deodatta Tungar
Date: 2021.07.26 17:39:35 +05'30'

**(सुधीर तुंगार)**
शासनाचे सह सचिव

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,
२. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
४. मा. मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव,

५. मा. विरोधी पक्षनेता (विधानसभा व विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ)
६. मा. राज्यमंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे खाजगी सचिव,
७. सर्व खाजगी सचिव, मा. मंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री कार्यालये, मंत्रालय, मुंबई.
९. सर्व विभागीय आयुक्त,
१०. जिल्हाधिकारी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा व सांगली,
११. उपायुक्त पुरवठा (कोकण व पुणे विभाग),
१२. जिल्हा पुरवठा अधिकारी रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, सातारा व सांगली,
१३. सर्व मंत्रालयीन विभाग,
१४. वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई
१५. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
१६. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, ६वा मजला, विधानभवन, मुंबई
१७. सर्व विधानसभा सदस्य व विधानपरिषद सदस्य
१८. सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक,
१९. निवडनस्ती (कार्यासन नापु-२२)